आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
९ एप्रिल २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बारामती विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार, मात्र बारामती आणि राहुरीतही बिनविरोध निवडणूक नाहीच

- विधानसभा निवडणुकांसाठी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत केरळात ७५ आणि आसाममधे ८४ टक्क्यापेक्षा जास्त, तर पुदुचेरीत सुमारे ८७ टक्के मतदान

- १५ हजार ४०० टन एलपीजी घेऊन भारताचं ग्रीन आशा जहाज मुंबईजवळच्या जेएनपीए बंदरात दाखल

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ९३१ अंकांची घसरण

**आणि**

- आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत भारतीय महिला संघानं १० पदकांसह पटकावलं अव्वल स्थान

**<><><><><>**

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांमधे पोटनिवडणूक बिनविरोध होणार नाही हे आज स्पष्ट झालं. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी बारामतीमधून काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी अर्ज मागे घेतला. बारामतीमध्ये सध्या २३ उमेदवार रिंगणात आहेत. तर राहुरीमध्ये २३ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानं ७ जण निवडणूक रिंगणात आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

\- **- होल्ड व्हाइस कास्ट- - -**

*(अजित पवार यांच्या निधनामुळं रिक्त झालेली बारामतीची विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून सुरुवातीपासून प्रयत्न सुरू होते. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडनवीस यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना फोन करुन काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेण्याची विनंती केली. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याशी चर्चा केली होती. त्यामुळं महाराष्ट्राची सभ्यता, सुसंस्कृतपणा विचारात घेऊन उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचं सपकाळ यांनी जाहीर केलं. त्याचवेळी अजित पवार यांच्या*

*निधनाची चौकशी व्हावी या भूमिकेवर काँग्रेस पक्ष ठाम असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. तसंच २०२९ च्या निवडणुकीत बारामतीतून काँग्रेसचा आमदार असेल, असा दावा सपकाळ यांनी केला. आता बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्यासह करुणा मुंडे-शर्मा, अभिजित बिचकुले, यांच्यासह एकूण २३ जण निवडणूक रिंगणात आहेत.*

*राहुरीमध्ये भाजपाचे अक्षय कर्डीले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह ४ अपक्ष उमेदवारांमध्ये लढत होणार आहे.*

*बारामती आणि राहुरीमध्ये २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.)*

<><><><><>

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांसाठी आज झालेल्या मतदानाची ५ वाजेपर्यंतची आकडेवारी हाती आली आहे. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आसाममधे ८४ पूर्णांक ४२ शतांश टक्के मतदान झालं. सर्वाधिक मतदान दक्षिण सलमारा मंकाचार जिल्ह्यात ९४ पूर्णांक ८ शतांश टक्के झालं.

केरळात ७५ पूर्णांक १ शतांश टक्के मतदान झालं. कोझिकोळ्ळ मधे सर्वाधिक म्हणजे सुमारे ७८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुदुचेरीतल्या जवळजवळ ८७ टक्के मतदारांनी मतदान केलं.

<><><><><>

कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी देखील आज मतदान झालं आहे. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत बागलकोटमधे ६५ पूर्णांक६८ शतांश तर दावणगिरीत ६३ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदान झालं.

नागालँडमधे कोरिडांग मतदारसंघात ८० पूर्णांक ६२ शतांश टक्के तर त्रिपुरामधे धर्मनगर मतदारसंघात ७९ पूर्णांक ८४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

<><><><><>

गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. बीड जिल्ह्यात श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९४व्या नारळी

सप्ताहाच्या समारोपावेळी ते बोलत होते. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी रस्ता बांधणं असो किंवा अन्य कुठलाही प्रश्न असो, तो सोडवण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

<><><><><>

१५ हजार ४०० टन एलपीजी साठा घेऊन भारताचं 'ग्रीन आशा' हे जहाज होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून आज मुंबईजवळ जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या बंदरात दाखल झालं. इराण, विरुद्ध अमेरिका आणि इस्राएलचं युद्ध सुरु झाल्यापासून जे एन पी ए बंदरात आलेलं हे पहिलंच एलपीजीवाहू जहाज आहे. बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी नवी दिल्लीत आयोजित आंतरमंत्रालयीन पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली.

देशात घरगुती वापराच्या सिलेंडर्सचं वाटप १०० टक्के करण्याची ग्वाही सरकार देत असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९३१ अंकांची घसरण झाली आणि तो ७६ हजार ६३२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२२ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ७७५ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मंगोलियात उलानबतार इथे झालेल्या आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला संघाने १० पदकांसह अव्वल स्थान पटकावलं आहे. यात चार सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्यपदकांचा समावेश आहे. सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंमध्ये मीनाक्षी, प्रीती, प्रिया आणि अरुंधती या चौघींचा समावेश आहे. पुरुष गटाची अंतिम फेरी उद्या होणार असून त्यात विश्वनाथ सुरेश आणि सचिन हे दोन्ही भारतीय खेळाडू आहेत. त्यामुळे भारताची दोन पदकं निश्चित झाली आहेत.

<><><><><>

महिला आरक्षण विधेयक अधिक बळकट करण्यासाठी १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षण याबाबत लेख लिहून तसंच समाज माध्यमावरच्या चित्रफितीतून माहिती दिली आहे.

विधीमंडळांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्व सुनिश्चित करणं, हे बळकट आणि सर्वसमावेशक लोकशाहीसाठी अत्यावश्यक असल्याचं सांगितलं.

देशाच्या लोकसंख्येत निम्मा वाटा असलेल्या महिलांचं राष्ट्राच्या उभारणीतलं योगदान अमूल्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. महिला जेव्हा प्रशासकीय तसंच निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात, तेव्हा त्या आपल्या अनुभवांतून आणि दृष्टिकोनातून प्रशासनाची गुणवत्ता वाढवतात, असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

चीनमध्ये निंगबो इथं सुरु असलेल्या बॅडमिंटन आशिया अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष एकेरी गटात भारताच्या आयुष शेट्टी यानं तैवानच्या ची यु जेन याला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. परंतु एच एस प्रणॉय पराभूत होऊन स्पर्धेबाहेर गेला आहे. महिला एकेरी गटातही भारताची पी व्ही सिंधू चीनच्या द्वितीय मानांकन प्राप्त वांग झियी कडून पराभूत होऊन स्पर्धेबाहेर गेली आहे. मिश्र दुहेरीतही भारताचा संघ पराभूत झाला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्समध्ये सामना रंगेल. कोलकाता इथे इडन गार्डन मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

बालकांना सकस अन्नाची असलेली गरज सार्वत्रिक असून तिचे एका लोकचळवळीत रूपांतर व्हावं यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. ‘पोषण पखवाडा २०२६’ च्या ८व्या टप्प्याचा प्रारंभ त्यांनी आज नवी दिल्लीत केला तेव्हा त्या बोलत होत्या. ‘बालकांच्या पहिल्या सहा वर्षांमध्ये जास्तीत जास्त मेंदूचा विकास घडवून आणणे’ हा या पोषण पखवाड्याचा विषय आहे. स्थानिक आणि पारंपरिक पोषक पदार्थांची मातांना नव्याने ओळख करून देणे त्याद्वारे ॲनिमिया आणि कुपोषण कमी करणे यावर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भर द्यावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

जागतिक बँकेनं भारताच्या आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज बदलून वाढवला आहे. या आधी २०२६ - २७ या वर्षात भारताची जीडीपी वाढ ६ पूर्णांक ३ दशांश टक्के दरानं होईल असा अंदाज होता. तो आता ६ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल असं जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. या वर्षात भारत दक्षिण आशियातल्या आर्थिक प्रगतीचं इंजिन असेल असं अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहिल.

//<><><><><>//